**आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट** >> पान 2

**व्यावसायिक निखिल दर्यानानी यांचे अपहरण करुन १५ लाखांची खंडणी उकळणाऱ्या चौघांना अटक** >> पान 3

**एकीकडे पाणीटंचाई तर दुसरीकडे ग्रामपंचायतकडे कर भरणा न केल्याने गावात भीषण पाणी टंचाई** >> पान 4


**सुविचार**

सुख-शांती हवी असेल तर संयम आणि शिस्त आवर्जून पाळा.



दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 238 ■ शुक्रवार, दि. 11 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

समाजातील विषमता दूर करून समतेचे बिजारोपण करणारे क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !

# एसटी कर्मचाऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशा!

## इतिहासात पहिल्यांदाच या महिन्यात केवळ ५६ टक्के पगार, कर्मचारी संघटना आक्रमक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : नुकतेच राज्य सरकारने एस टी कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या संदर्भात केवळ ५६ टक्के पगार देणार असल्याचे जाहीर करताच एस टी कर्मचाऱ्यांनी याला कडाडून विरोध दर्शविला आहे. नेहमीच एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला जातो. मात्र, एसटीच्या इतिहासात पहिल्यांदाच एसटी कर्मचाऱ्यांचा पगार या महिन्यात फक्त ५६% झालेला आहे. निधी नसल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचा पगार इतका कमी झालेला आहे. एसटी कामगार संघटनांनी मात्र यावर संताप व्यक्त केला आहे. आधीच अपुरा पगार आणि त्यात जर फक्त ५६% पगार मिळणार असेल तर एसटी कर्मचाऱ्यांनी जगायचं कसं असा प्रश्न महाराष्ट्र एसटी कर्मचारी सरकारकडे उपस्थित करत आहेत. तसेच सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. जर सरकारने हा निर्णय बदलला नाही तर आम्ही कोणत्याही क्षणी आंदोलनाची भूमिका घेऊ असा इशारा एसटी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिला आहे.**

नेहमीच एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला जातो. मात्र एसटीच्या इतिहासात पहिल्यांदाच एसटी कर्मचाऱ्यांचा मागे घेतला होता. आता एसटी महामंडळावर अधिकृतपणे परिवहनमंत्री प्रताप सरनाईकच राहणार असल्याचा शिक्कामोर्तब झालाय.




महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची लोकवाहिनी असलेल्या एसटीला भविष्यात आर्थिक दृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले आहेत. तसेच आपल्याला या पदावर नियुक्त करून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

परिवहनमंत्रीच एसटी महामंडळाचे अध्यक्ष

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी महामंडळ) स्थापना करण्यात आली. र.गो.सरैय्या हे महामंडळाचे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर अनेक महत्त्वाच्या व्यक्तीनी एसटी महामंडळाचे अध्यक्षपद भूषविले आहे. प्रताप सरनाईक हे एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष असणारं आहेत. २०१४ ते २०१९ मध्ये दिवाकर रावते हे परिवहन

>> पान २

# महाराष्ट्र तापला

## तापमानाची पन्नाशीकडे झेप!

मुंबई : महाराष्ट्र सध्या प्रचंड तापलाय. तापमानाचा उद्रेक होत असून आता कमाल तापमान पन्नाशीकडे झेप घेत असल्याचे चित्र आहे. आज बहुतांश ठिकाणी कमाल तापमान ४० अंशांच्या वर गेलं आहे. हवामान विभागाच्या विशेष तापमान अंदाजानुसार, आज नंदूरबारमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.३ अंशांवर स्थिरावला आहे. जळगाव, अकोल्यात ४३.७ अंशांची नोंद झाली आहे. संपूर्ण राज्यात उष्णतेचा दाह वाढला आहे. दरम्यान, विदर्भात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात प्रचंड उष्ण आणि दमट हवामान राहणार आहे.

महाराष्ट्रात सध्या विदर्भ वगळता उर्वरित संपूर्ण राज्यात तापमानाचा उच्चांक झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भात पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. अमरावती,यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांना

### नंदुरबार ४५.३ अंश, विदर्भात ३ दिवस अवकाळी



अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय. तर मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, आणि बीड जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा देण्यात आलाय. छत्रपती संभाजीनगरमध्ये आज ४२.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात सामान्यहून अधिक नोंदवण्यात आलंय. किमान तापमानही प्रचंड वाढल्यामुळे सकाळी साधारण ९ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका बसू लागलाय.

तुमच्या जिल्ह्यात किती तापमान?

संपूर्ण विदर्भात सध्या ४० अंशांहून अधिक तापमानाची नोंद होणार आहे. आजपासून पुढील ३ दिवस अवकाळी पाऊस होणार असून तापमानापासून काहीसा दिलासा मिळणार आहे. मध्य महाराष्ट्रातही सध्या तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत.

>> पान २



# पदाधिकारी म्हणतात योजना अपूर्ण अधिकारी म्हणतात योजना पूर्ण तालुक्यातील वरुड येथील प्रकार

भाग २९

## ■ जल जीवन मिशन योजनेचा बट्ट्याबोळ
## ■ संबंधित अधिकारी मस्त गावकरी झाले त्रस्त

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर : तालुक्यातील वरुड येथे तब्बल एक कोटी ५३ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले. सदर काम अर्धवट असताना मेहकर उपविभागाचे उपविभागीय अभियंता यांनी चक्क आमदार सिद्धार्थ खरात व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत झालेल्या आम सभेतच खोटी माहिती देत जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाल्याचे सांगितले. त्यानंतर आपला विदर्भच्या टीमने गावात जाऊन वास्तव परिस्थिती जाणून घेतली असता मोठे गौडबंगाल उघड झाल्यानंतर.**

वरुड गावातील प्रथम नागरिक सरपंच यांनीच सदर योजनेचे ३० टक्के काम अपूर्ण असल्याचे सांगितल्याने अधिकाऱ्याकडून आमदार केंद्रीय मंत्र्यांची दिशाभूल करण्यात आली. यावरून अधिकारी शासनाच्या निधीचा गैरप्रकार करीत असल्याचा प्रकार आहे.? अधिकाऱ्यांच्या या दिशाभूल करणाऱ्या माहिती बाबत आमदार व खासदार काय भूमिका घेतात याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे. तालुक्यातील वरुड गावात तब्बल एक कोटी ५३ लाख रुपये याचा निधी मंजूर करून जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले. सदर काम अर्धवट असताना मेहकर उपविभागाचे उपविभागीय अभियंता यांनी २९ मार्च रोजी आमदार सिद्धार्थ खरात व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यासह इतर अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित आमसभेत मेहकर तालुक्यातील वरुड या गावातील जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाल्याची माहिती भर आमसभेत देऊन आमदार व मंत्र्याची दिशाभूल केली. त्यानंतर आपला विदर्भने वास्तव परिस्थिती जाणून घेण्यासाठी वरुड गावात जाऊन वास्तव परिस्थिती जाणून घेतली असता त्यामध्ये भलतेच गौडबंगाल उघड झाले. गावात पाण्याचा थेंबही नसताना अधिकाऱ्यांनी जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाल्याचे माहिती दिली. तर गावातली नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या असता गावात पाणी नाही. गावात पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीचे काम अर्धवट असताना अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्याची माहिती भर आम सभेत दिली आहे. तर सरपंचांनी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात येत असलेल्या कामातील तब्बल ३० टक्के काम अपूर्ण असल्याचे सांगितले आहे तर अधिकाऱ्यांनी किरकोळ कामाचे कारण दाखवीत पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्याचे सांगितले यावरून अधिकारी व पदाधिकारी यांच्यातच मात्र, कलगीतुरा रंगण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर, गावात आधी जुन्या नळ योजनेच्या विहिरीवरून तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होते. मात्र यंदा जलजीवन मिशन अंतर्गत जी विहीर घेण्यात आली. त्याविहिरीचे पाणी सुद्धा गावाला पुरवत नाही, अशी सुत्रांची माहिती आहे. एकदा विहिरीचा उपसा झाला की जवळपास पाच ते सहा दिवस पाणी यायला लागतात अशी सुद्धा माहिती आहे. वरील मिळाल्या सूत्रांकडून माहितीला सरपंचांनी सुद्धा दुजोरा दिला आहे त्यामुळे जलजीवन मिशन योजनेचा फायदा काय ?असा प्रश्न उपस्थित होत आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



### योजनेचे ३० टक्के काम अपूर्व

गावात आधी जुन्या नळ योजनेच्या विहिरीवरून तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होते. मात्र यंदा जलजीवन मिशन अंतर्गत जी विहीर घेण्यात आली. त्याविहिरी मधून जुन्या नळ योजनेच्या पाईप लाईनद्वारे गावाला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र जलजीवन मिशन अंतर्गत जी पाण्याची टाकी व नळ योजना व्हावी ती अद्याप झालेली नसून सदरील तिस टक्के काम योजनेचे बाकी आहे.

**–अतुल वानखेडे (सरपंच) वरुड**

### भूजल सर्वेक्षण विभाग ही संशयाच्या भोवऱ्यात

शासन शेतकऱ्यांना विहीर खोदण्यासाठी केवळ चार ते साडेचार लाख रुपये अनुदान देते.या अनुदानातून शेतकऱ्यांची विहीर खोदकाम करून बांधकाम होते. त्यांना चांगल्या प्रकारे पाणी लागते आणि त्यांची शेती ही बागायती होते. असे असताना जलजीवन मिशन योजनेच्या अंतर्गत विहिरीचे खोदकाम करताना जवळपास ५० टक्के विहिरी ह्या कोरड्या गेल्या असल्याची खमंग चर्चा आहे त्यामुळे भूजल सर्वेक्षण विभाग काय करतो असा प्रश्न निर्माण झाला आहे. एका विहिरीच्या खोदकामासाठी २० ते २५ लाख रुपयांच्या वर खर्च केल्या जातो आणि विहिरीला पाणीही लागत नाही अशा स्थितीत भूजल सर्वेक्षण विभाग मात्र काय कामाचा असा प्रश्न निर्माण होत असून भूजल सर्वेक्षण विभाग व जलजीवन मिशन योजनेचे योजना संशयाच्या भोवऱ्यात अडकली असल्याची चित्र संपूर्ण तालुक्यात दिसून येत आहे.

# आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट

## क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला.जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फ ुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।। हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली। नीतीविना गती गेली । गतिविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।। एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

## बॉबी देओलसोबत इंटिमेट सीन शूट करताना अस्वस्थ झाली 'ही'अभिनेत्री!

### दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'आश्रम' या गाजलेल्या वेब सीरिजमध्ये पम्मीची भूमिका साकारून लोकप्रिय झालेली मराठमोळी अभिनेत्री अदिती पोहणकर हिने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिच्या अभिनय प्रवासातील खास अनुभव शेअर केला. या मुलाखतीत तिने बॉबी देओलसोबतच्या इंटिमेट सीन बद्दल मोकळेपणाने बोलत, त्या काळात तिला आलेल्या भावनिक गुंतवणुकीचा आणि संकोचाचा खुलासा केला.अदितीने स्पष्ट केलं की इंटिमेट सीन्स शूट करणं तितकं सोपं नसतं. त्या वेळी दोन्ही कलाकारांमध्ये कम्फर्ट लेव्हल, विश्वास आणि संवाद अत्यंत महत्त्वाचे असतात. इम्तियाज अली यांचा उल्लेख करत तिने सांगितलं की, इंटिमेट सीन शूट करताना सहकलाकाराची सुरक्षितता आणि मानसिक स्थिती याची सातत्यानं काळजी घ्यावी लागते.'आश्रम'च्या सेटवर इंटिमसी को-ऑर्डिनेटर नसतानाही त्यांनी हे सीन्स अत्यंत सन्मानपूर्वक आणि समजूतदारपणे पूर्ण केले. ती म्हणाली, ''कधी कधी सीनच्या मध्ये कट झाल्यावरही आम्ही तीच पोझिशन ठेवावी लागायची, त्यामुळे एकमेकांशी सतत विचारपूस करत असायचो तू ठीक आहेस का?'' अशा सीनसाठी केवळ तांत्रिक तयारी नाही, तर मानसिक समजूतही महत्त्वाची असते.यावेळी ती म्हणाली की, दोन कलाकारांमध्ये भावनिक दुरावा नसला, तर ऑनस्क्रीन कम्फर्ट सहजपणे प्रेक्षकांना जाणवतो. ''शूटिंगदरम्यान मैत्री झाल्यामुळे संकोच दूर झाला. जर कलाकारांमध्ये बाँडिंग नसेल, तर ते पडद्यावरही दिसून येतं,'' असं ती म्हणाली. 'आश्रम'च्या शूटदरम्यानचा एक मजेदार किस्सा शेअर करत अदितीने सांगितलं की, ''एकदा मी बॉबी देओलचं लिट्टी-चोखा खाल्लं आणि नंतर त्याच्यासाठी ऑर्डर केलेली आलू टिक्कीही खाल्ली. त्याला ती खूप तिखट वाटली, आणि मग तीही मीच संपवली.''



**मेहकर/प्रतिनिधी : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले ८ एप्रिल रोजी जिल्हा दौऱ्यावर आले असता, आमदार सिद्धार्थ खरात यांनी त्यांची सदिच्छा भेट घेत मतदार संघातील विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनीही मतदारसंघातील विकासात्मक कामाबाबत संपूर्ण सहकार्य केले जाईल अशी ग्वाही आमदार सिद्धार्थ खरात यांना भेटीदरम्यान दिली.**

## मतदार संघातील विविध विषयांवर चर्चा : रामदास आठवले यांचे सहकार्य करण्याचे आश्वासन

केंद्रीय सामाजिक न्याय व सशक्तीकरण राज्यमंत्री रामदास आठवले ८ एप्रिल रोजी जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, समाज कल्याण अधिकारी यांच्या समवेत शासकीय विश्रामगृह येथे सामाजिक न्याय विभागाच्या योजनेबाबत बैठक घेतली. यावेळी त्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील विकासात्मक कामाचा आढावा घेतला. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या योजनांबाबत माहिती घेत सदर योजनाची अंमलबजावणी करून गरजूंना लाभ देण्याचे निर्देश यावेळी यंत्रणेला दिले. त्यानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व सशक्तीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेतली. या सदिच्छा भेटीत त्यांनी रामदास आठवले यांचे स्वागत करून त्यांच्या सोबत मतदार संघातील विकासात्मक बाबीवर चर्चा केली. मतदारसंघातील समस्या त्यांच्यासमोर मांडून सदर समस्या सोडविण्याबाबत आपण आपल्या स्तरावरून सहकार्य करावे, अशी अपेक्षाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी व्यक्त केली. त्याचबरोबर राजकीय सामाजिक विषयांवर हितगुज साधून मतदार संघातील सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करून यासाठी आपण मदत करावी, अशी मागणी यावेळी त्यांनी केली. तर, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांच्यासोबत मनमोकळेपणाने गप्पा करून मतदार संघातील विकासात्मक कामाचा आढावा घेतला.यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या समस्या औद्योगिक समस्या, इतर पायाभूत समस्या, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासमोर मांडून त्या निकाली काढण्यासाठी आपण पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली. तर, केंद्रीय मंत्री आठवले यांनीही मतदार संघातील विकासासाठी पुरेपूर सहकार्य केले जाईल अशी ग्वाही आमदार खरात यांना दिली. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले आमदार सिद्धार्थ खरात यांचे कौतुक

**मंत्रालय सहसचिव पदावर कार्यरत असताना समाजसेवेचा वसा उचलून पैसा, प्रतिष्ठा सोडून राजकारणात येत गोरगरिबांच्या प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत धडपडणारे व्यक्तिमत्व म्हणून आमदार सिद्धार्थ खरात यांची मतदारसंघात ओळख आहे.आमदार सिद्धार्थ खरात यांच्या गोरगरीब, सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी सुरू असलेल्या सतत परिश्रमाबद्दल व विधानसभा तसेच शासन दरबारी मतदारसंघातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी करण्यात येत असलेल्या पाठपुराव्याबद्दल केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या कार्याचे कौतुक केले. त्याचबरोबर राजकीय क्षेत्रात आपल्यासारख्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाची गरज आहे. अभ्यासुवृत्तीतून मतदार संघातील अनेक प्रश्न निकाली काढता येण्यास मदत होईल, असे मत व्यक्त करत आमदार सिद्धार्थ खरात यांच्या कार्याचे कौतुक केले.**

## महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला साईचरणी लीन





**शिर्डी/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी आज शिर्डी येथे येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले आहे. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी त्यांचा सत्कार केला आहे.

## लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** खोपोली, कर्जत, बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर येथून नोकरीच्या निमित्ताने म ुंबईच्या दिशेने जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. गाड्यांची संख्या वाढवली, निवडक १५ डब्यांच्या गाड्या सोडल्या तरी गर्दी कमी होत नाही. याच गर्दीचा फटका एका २५ वर्षाच्या तरुणाला बसला. अंबरनाथ रेल्वे स्थानकाजवळ २५ वर्षीय तरुणाचा अपघाती मृत्यू झाला. लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू झाला. रोहित मगर असे या तरुणाचे नाव आहे. तो उल्हासनगरच्या स्म्राट अशोक नगरचा रहिवासी होता.

पान १ वरून...

### एसटी कर्मचाऱ्यांच्या

मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात अनिल परब यांच्याकडे मंत्रिपदची आणि अध्यक्षपदाची जबाबदारी होती. हीच परंपरा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना कायम ठेवण्यात आली. त्यावेळी एकनाथ शिंदे हेच राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी या परंपरेला ब्रेक दिला होता. आता शिंदे गटाचे मंत्रीच एसटी महामंडळावर पुन्हा कायम ठेवण्यात आल्याने चर्चांना पूर्णविराम मिळालाय. दरम्यान, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर काहीच दिवसांत एसटीच्या बस प्रवासात १४.९५ टक्क्यांनी वाढ करण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं होतं. त्यानंतर दरवाढीवरुन राज्यभरात प्रवाशांची तीव्र नाराजीची लाट उसळली होती. तसेच विरोधकांनीही सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान,आता एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीवरून एसटी कर्मचाऱ्यांमध्ये चिंता आहे.

### महाराष्ट्र तापला

मराठवाड्यातही प्रचंड तापमान नोंदवले जात आहे.

विदर्भ:नागपूर ४०.५, वर्धा ४१.०, चंद्रपूर ४२.२, गडचिरोली ४०.२, गोंदिया ३८.६, अमरावती ४२.०, अकोला ४३.७, बुलढाणा ३९.६, वाशिम ४१.४, यवतमाळ ४१.४

मध्य महाराष्ट्र:पुणे ४०.७, सातारा ३९.७, सांगली ३७.९, कोल्हापूर ३७.८, सोलापूर ४०.१,नाशिक ४१.३, जळगाव ४३.७, धुळे ४५.३, नंदुरबार ४५.४

कोकण विभाग: रायगड ३५.२, रत्नागिरी ३५.६, सिंधुदुर्ग ३७.८, ठाणे ३८.०, पालघर ३६.२, मुंबई उपनगर ३३.७, मुंबई शहर ३३.९

मराठवाडा: परभणी ४०.९, नांदेड ४०.५, लातूर ३९.०, धाराशिव ३९.८अंशांवर तर छत्रपती संभाजीनगर ४२.५ अंशावर आहे.

## जिल्हा स्त्री रुग्णालयात जागतिक होमिओपॅथी दिनाचे आयोजन

### होमिओपॅथी जीवन गौरव पुरस्काराचे होणार वितरण

**बुलडाणा/प्रतिनिधी :** होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांच्या जयंतीनिमित्त येथील आयुष विभाग व होमिओपॅथीक डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने १२ एप्रिल २०२५ रोजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेत जागतिक होमिओपॅथी दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी होमिओपॅथी जीवन गौरव पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

जागतिक होमिओपॅथी दिन कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संजय गायकवाड यांच्याहस्ते होणार आहे. जेष्ठ होमिओतज्ज्ञ तथा पंचशील होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. दादासाहेब कवीश्वर, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अजित शिरसाट यांच्यासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेश जतकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमात होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच होमिओ तपस्वी स्व. डॉ.अजय ढगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या होमिओपॅथी जीवन गौरव पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. सदर पुरस्कार उल्हासनगर येथील प्रसिद्ध होमिओ तज्ञ डॉ. अमरसिंह गौतम, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पळसखेडा व ग्रामीण भागात होमिओपॅथीद्वारे अनेक दुर्धर आजारांवर उपचारे करणारे प्रसिद्ध होमिओ तज्ञ डॉ. बाळासाहेब ना. महानोर, डेबको या होमिओपॅथी औषध निर्मिती संस्थेचे प्रमुख नंदकिशोर देशपांडे यांना जाहिर झाला असून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले आहे.

## जेजुरीच्या खंडोबा मंदिर आणि गडाला राज्यस्तरीय स्मारकाचा दर्जा

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीचे खंडोबा मंदिर व गड कोटाला पुरातत्त्व खात्याने राज्यस्तरीय संरक्षित स्मारकाचा दर्जा घोषित केला आहे. याबाबतचे पत्र श्री मार्तंड देवस्थानाला पाठविण्यात आले आहे.

राज्य सरकारने तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर केला असून, यासाठी ३४९ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे.त्यांपैकी सुमारे १०९ कोटी रुपयांची विकासकामे पहिल्या टप्प्यात सुरू आहेत. जेजुरीचे खंडोबा मंदिर व गडकोट हे राज्य संरक्षित स्मारक यापूर्वीच घोषित करण्यात आले असून, याबाबतचे पत्र पुणे पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहने यांनी दिले आहे. त्यामुळे आता खंडोबा गडावर विकासकामे करण्यासाठी शासनाची अधिक मदत होणार असल्याचे विश्वस्त मंडळाकडून सांगण्यात आले.विश्वस्त मंडळाने ही माहिती पालखी सोहळा खांदेकरी, मानकरी, नित्य सेवेकरी, पुजारी सेवेकरी आणि ग्रामस्थांना दिली. या वेळी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त ॲड पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे, अनिल सौंडदे, ॲड. विश्वास पानसे, माजी विश्वस्त नितीन राऊत, संदीप जगताप, व्यवस्थापक आशिष बाठे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, कृष्णा कुदळे, पंडित हरपळे, बापू सातभाई, माधव बारभाई, सचिन मोरे, भाग्येश बारभाई आदी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# व्यावसायिक निखिल दर्यानानी यांचे अपहरण करून १५ लाखांची खंडणी उकळणाऱ्या चौघांना अटक



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी : व्यावसायिक निखिल दर्यानानी यांचे अपहरण करून १५ लाखांची खंडणी उकळणाऱ्या चौघांना शहर गुन्हेशाखेच्या युनिट एक च्या पथकाने अटक केली आहे. गेल्या पाच दिवसांपासून युनिट एकचे पथक संशयितांच्या मागावर होते. अपहरणकर्ते हे सराईत गुन्हेगार असून, पाचवा संशयितांच्या मागावर पोलिसांची पथके आहेत. व्यावसायिक निखिल दर्यानानी यांचे गेल्या शुक्रवारी ४ तारखेला दुपारी काठेगल्लीतून त्यांच्या कारमधून संशयित तिघांनी अपहरण केले होते.**



संशयितांनी निखिल यांना बंदुकीचा धाक दाखवून त्यांच्या कारने घोटीच्या दिशेने घेऊन जात असताना, त्यांच्याकडे १ कोटी खंडणीची मागणी केली होती. घोटी-इगतपुरीदरम्याने निखिल यांना दुसऱ्या वाहनात बसविण्यात आले तर, त्यांची कार तिसरा संशयित परत नाशिकला घेऊन आला. त्यानेच खंडणीची १५ लाखांची रोकड स्वीकारली होती. दरम्यान, अपहरण नाट्याची उकल होत नसल्याने सदरचा प्रकार बनाव असावा असा अंदाज व्यक्त होत होता. परंतु गेल्या पाच-सहा दिवसांपासून गुन्ह्याचा तांत्रिक विश्लेषणानुसार तपास करताना शहर गुन्हेशाखेच्या युनिट एकच्या पथकाने संशयितांचा माग काढून परजिल्ह्यातून दोघांना तर दोघांना नाशिक मधून अटक केली आहे. पोलिस तपासातून या अपहरण नाट्याची उकल, संशयितांचे कटकारस्थान, त्यांच्या मागे आणखी कोण याची चौकशी होणार आहे .

## संक्षिप्त...

### जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर दोन गटात तुफान दगडफेक; ५ जण जखमी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना येथे गुरुवार दि. १० एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४:३० वाजता दोन गटात तुफान दगडफेक झाली. या घटनेत ५ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दगडफेकीत दोन्ही गटातील जवळपास ५ जण जखमी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. दगडफेकीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. जालन्यातील कदीम जालना पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आहे. जालना जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर दोन गटात दगडफेक सुरु असताना, सर्वसामान्य नागरीक सैरावैरा पळू लागले. दगडफेकीचं कारण अद्याप समोर येऊ शकले नाही, परंतु ॲडमीट असलेल्या रुग्णाला भेटण्यासाठी आलेल्या एका गटावर सुरुवातीला चाकूने हल्ला झाला. त्यानंतर तुफान दगडफेक सुरु झाली. याच वेळी रुग्णालयात आरोपींना घेऊन आलेल्या ज्ञानेश्वर जारवाल यांनी सिव्हिल ड्रेसवर असताना देखील धावत जाऊन परिस्थिती हाताळली. चाकू हल्ला करणाऱ्याच्या हातातून चाकू हिसकावून घेत जप्त केला. परंतु जारवाल यांनी दगडफेक सुरु असतानाही स्वतः परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करीत होते. जालना जिल्हा सामान्य रुग्णालयसमोर दोन गटात दगडफेक झाली असताना, पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अधिकचा तपास पोलिस आता करत आहे. सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.


### निकलक अकोलो येथे जनावरांच्या गोठ्याला लागली भीषण आग



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामध्ये अकोला या गावात अचानक भर दुपार १२:३० वाजेच्या सुमारास भीषण आग लागली. या गावाशेजारी असलेल्या जनावरांच्या गोठ्याला ही आग लागली असून, या आगीत गोठ्यात बांधलेले १५ ते २० शेतकऱ्यांची ३० ते ४० जनावरे जळाली असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे, ही आग विझवण्यासाठी नागरिकांची मोठी तारांबळ उडाली, यादीत काही शेतकऱ्यांनी जीवाची भाजी लावत या मुक्या जनावरांना वाचवले आहे. यावेळी काही शेतकऱ्यांनी फायर ब्रिगेड यांच्याशी संपर्क केला असता, तो संपर्क होऊ शकलेला नाही.

### पगार कमी झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप, आठ तारखेपासून काम बंद आंदोलनाचा इशारा



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सरकारने महामंडळाच्या निधीमध्ये कपात केल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांना तब्बल ४४% पगार कपात करून मिळाला.



पगारी मधून फक्त ५६% पगार या कर्मचाऱ्यांना मिळाला. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. मुला बाळांचे शिक्षण, बँकांचे हप्ते, घर खर्च कसा काढायचा असा संतप्त सवाल कर्मचाऱ्यांनी विचारला. महिनाभर मेहनत करायची आणि पगारीच्या दिवशी नाराजी पदरी पडायची, यामुळे आम्ही सरकारचा तीव्र निषेध करतो. अशा भावना कर्मचाऱ्यांच्या आहेत. येणाऱ्या सात तारखेला वेळेवर पगार आणि पूर्ण पगार नाही झाला तर, आठ तारखेपासून काम बंद आंदोलनाचा इशारा देखील कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

### एस.टी कर्मचाऱ्यांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्या या हेतूने सरकार काम करत आहे - मंत्री संजय राठोड

**नांदेड/प्रतिनिधी :** आज महाराष्ट्र राज्याचे मंत्री संजय राठोड हे नांदेड जवळ आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले की,



मी कालच्या कॅबिनेट मंत्र्यांच्या बैठकीला नव्हतो, पण मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी एसटी महामंडळ मध्ये नवीन बस तसेच वाहक व चालत यांच्यासाठी निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या हेतूने चर्चा झाली असून, त्या दृष्टीने एसटी कर्मचाऱ्यांना चांगल्या सुविधा देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या वक्तव्याची त्यांनी माफी देखील मागितली आहे. त्यांचा हेतू ते बोलण्याचा नव्हता, पण विरोधकांनी त्याला राजकारण म्हणून पाहिले आहे. अशी टीका संजय राठोड यांनी विरोधकांवरती केली आहे.



### सिल्लोड शहरात भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सिल्लोड येथे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सिल्लोड शहर व तालुक्यात आज दिवसभर भगवान महावीर जयंतीचा उत्साह पहायला मिळाला. भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवा निमित्त शहरातील भगवान महावीर जैन मंदिर येथून सवाद्य भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभा यात्रेत आ. अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधत भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

### साधा भोळा चेहरा अन् भानगडी सोळा, असे काही लोक उपमुख्यमंत्री शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर तुफान टोलेबाजी

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** मी फेवरेट ब्रदर तर काही जण बंगल्यात बसलेले फुकट बाबुराव आहेत. अशी मिश्किल टिपण्णी करत उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर जोरदार टोलेबाजी केली आहे. काही लोक भोळा चेहरा ही करतात. असे म्हणत ही ठाकरेंवर सांगोल्यातून निशाणा साधला.





सांगोला येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरण कार्यक्रमासाठी एकनाथ शिंदे सांगोल्यात आले होते यावेळी शिंदे यांनी ठाकरे यांच्यावर निशाणा साधत फडणवीस सरकार वर आपण नाराज नाहीत. आमच्या खुर्च्या बदलल्या मन नाहीत. असे सांगायला ते विसरले नाहीत.

तसेच, खुर्च्या बदलल्या पद बदलली पण आमची मन नाहीत बदलली, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खांदेपालट झाल्यानंतर सांगोल्यात मोठे वक्तव्य केले आहे.

मला लाडक्या बहिणींचा भाऊ ही ओळख मिळाली ती सगळ्या पदा पेक्षा मोठी आहे. आमची पदे बदलली, खुर्च्या बदलल्या पण मने बदलली नाही. इरादे बदलले नाहीत. दिल वही हौसले भी वही कायम है प्राण जाये पर वचन नहीं जाए अस काम आम्ही करत राहू.

### भिवंडीत महावीर जयंती उत्साहात साजरी



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** विश्वाला अहिंसेचा संदेश देणारे जैन धर्मियांचे तिर्थनकार भगवान महावीर यांची जयंती भिवंडी शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने समस्त भिवंडी जैन महासंघाच्या वतीने आयोजित केलेल्या शोभायात्रेत हजारोच्या संख्येने स्त्री, पुरुष, आबालवृद्ध, लहान बालके मोठ्या भक्ती पूर्ण वातावरणात शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते. सामाजिक सदभाव, अहिंसा, पर्यावरण संवर्धन, शाकाहार याबाबत जनजागृती करणारे विविध देखावे या शोभायात्रेत सहभागी करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू झालेली शोभायात्रा मंडई, गौरीपाडा, कणेरी, धामणकर नाका, येथून अंजूर फाटा या ठिकाणी शोभयात्रेचा समारोप करण्यात आला. या शोभायात्रेचे ठिकठिकाणी विविध मान्यवरां कडून स्वागत करण्यात आले असून पोलीस बंदोबस्त देखील ठेवण्यात आला होता.

# ई-मंत्रिमंडळ कागद विरहित भविष्यासाठी एक पाऊल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून व डिजिटल इंडिया अभियानाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाने नागरिक सेवा अधिक प्रभावीपणे डिजिटल स्वरूपात पुरवण्याचा संकल्प केला आहे. शासन व नागरिक यांच्यातील दुरावा कमी करून प्रशासन अधिक जवळ आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. 'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल, अशी माहिती राज्य शासनामार्फत देण्यात आली आहे.

महाराष्ट्राने डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित ई-गव्हर्नन्सच्या दिशेने उल्लेखनीय प्रगती केली आहे. 'ई-ऑफिस', 'सेंट्रल रजिस्ट्री युनिट' (जे मंत्रालयातील सर्व पत्रव्यवहारांचे डिजिटायझेशन करते), 'आपले सरकार' व 'जिल्हास्तरीय सुशासन निर्देशांक यांसारख्या अनेक ॲप्लिकेशन्स व प्रणालींमुळे ही प्रगती शक्य झाली आहे. याशिवाय, प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी लिपीक वर्गापासून ते मंत्र्यांपर्यंत ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर शासकीय यंत्रणेतील सर्वच स्तरांवर करण्यात येतो आहे.

गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व आमदार व विधानपरिषदेतील सदस्य ( व ) सभागृहातील कामकाजासाठी टॅबलेटचा वापर करत आहेत, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया कागदविरहित होत आहे.





'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल. या प्रणालीमुळे मंत्रिमंडळ बैठकीचे नियोजन, संदर्भ शोधणे, निर्णयांची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने कार्यपद्धतींचे परीक्षण अधिक सोप्या पद्धतीने करता येणार आहे. बैठकीदरम्यान ठेवण्यात येणाऱ्या अतिरिक्त विषयांचाही या प्रणालीत समावेश करता येईल. कागदपत्रांच्या वितरणाची घाई न करता, 'ई-मंत्रिमंडळ' प्रणालीमुळे बैठकीचे अजेंडे व संबंधित कागदपत्रे एकाच क्लिकमध्ये मंत्र्यांच्या वर उपलब्ध होतील अगदी वर एखादी फाईल उघडावी तितक्या सहजतेने.

'ई-मंत्रिमंडळ' प्रणाली सुरळीत चालावी यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विशेष अभियंत्यांची नियुक्ती केली जाणार आहे, जे मंत्र्यांना आवश्यक तांत्रिक मदत करतील. मंत्र्यांना उपलब्ध करून दिलेले ipad हे केवळ 'ई-मंत्रिमंडळ' पुरतेच मर्यादित नसून, ते ई-ऑफिस प्रणालीद्वारे कुठूनही प्रकरणे निर्णित करण्यासाठी, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकींसाठी, डॅशबोर्डवर योजनांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी तसेच CPGRAMS, RTS महाराष्ट्र किंवा 'आपले सरकार' यांसारख्या नागरिकाभिमुख ॲप्लिकेशन्सचे परीक्षण करण्यासाठी वापरले जातील. अनेक शासकीय ॲप्लिकेशन्स मोबाईल ॲप्समध्ये रूपांतरित होत असल्यामुळे ipad ही कार्यालयीन कामासाठी मंत्री महोदयांना अत्यंत उपयुक्त साधन ठरणार आहे.

महाराष्ट्र आता उत्तराखंड, उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि त्रिपुरा यांच्यानंतर 'ई-कॅबिनेट' प्रणाली लागू करणारे सातवे राज्य होणार आहे. याशिवाय, मध्य प्रदेश सुद्धा या प्रणालीच्या अंमलबजावणीच्या तयारीत आहे.

# एकीकडे पाणीटंचाई तर दुसरीकडे ग्रामपंचायतकडे कर भरणा न केल्याने गावात भीषण पाणी टंचाई

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : तालुक्यात पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले असून नागरिकांना पाण्यासाठी तब्बल पाच पाच किलोमीटर रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. असे असताना ग्रामपंचायतीचे पाण्याचे स्त्रोत काही प्रमाणात मात्र बंद आहेत. एकीकडे भीषण पाणी टंचाई तर, दुसरीकडे मात्र तब्बल ४० लाखाच्यावर हात पंपाचा कर भरणा बाकी असल्याने अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या या निष्काळजी पणाचा फटका? सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागत आहे. एकीकडे पाण्यासाठी भटकंती सुरू असताना दुसरीकडे हातपंप दुरुस्ती कर भरणा न केल्याने हातपंप असून ओळंबा नसून खोळंबा अशी गत झाली आहे. याकडे अधिकाऱ्याने गाभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.**



अंजनी ग्रामपंचायत अंतर्गत लांडेवाडी गावातील हातपंप नादुरुस्त..!

मेहकर तालुक्यामध्ये ४६९ हातपंप असून यातील २१ हातपंप हे पाण्याअभावी बंद आहेत. तर,दहा हात पंप दुरुस्ती अभावी बंद आहेत. दुरुस्ती पथककडून सदर हातपंप दुरुस्त करण्याचे काम केले जात आहे. आतापर्यंत ३९ लाख ७३ हजार ४०० रुपये थकबाकी आहे. तर, ग्रामपंचायतीने केवळ ९८ हजार रुपये वसुली करून भरणा केलेला आहे. सध्याही ४० लाखाच्या जवळपास कर भरणा बाकी आहे. एकीकडे भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. पाण्यासाठी जनतेची सहर्ष होलपट सुरू आहे. तर दुसरीकडे वसुली अभावी अनेक गावातील हातपंप बंद असल्याची सूत्रांची माहिती. जलजीवन मिशन योजनेच्या कामातही प्रचंड अनियमितता झाल्याने एकही काम पूर्णत्वास गेले नाही, अशा स्थितीत जनतेने काय करावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. अधिकारी पदाधिकाऱ्यांसमोरच खोटी माहिती देऊन सर्वसामान्य जनतेचे ला काय तब्बल केंद्रीय मंत्र्याची व आमदारांची दिशाभूल करत खोटी माहिती देत असल्याने सर्वसामान्यांची काय बिशाद आहे.असा प्रश्न निर्माण झाला आहे. गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पाण्याचे मुख्य स्त्रोत असलेल्या काही गावातील हात पंपही नादुरुस्त असल्यामुळे पाणीटंचाईला सामोरे जावे लागु शकते.?

ज्या ज्या गावातील ग्रामपंचायतीच्या हातपंप बंद असल्याच्या तक्रारी आमच्यापर्यंत पोहोचल्या व पोहोचतील त्या त्या गावातील हातपंपाची दुरुस्ती करण्यात येईल असे आपला विदर्भाशी बोलताना संबंधितांनी व्यक्त केले आहे.

## विविध वृत्त...

### जिल्ह्यात १४ एप्रिलला कोरडा दिवस; मद्यविक्री बंद ठेवण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश जारी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी दि. १४ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्त्या, बिअर शॉपी विक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने मुंबई दारूबंदी कायद्यामधील कलम अन्वये अधिकाराचा वापर करून बुलढाणा जिल्ह्यातील सर्व किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्त्या सीएल-३, एफएल-२, सीएलटीओडी-३, एफएलबीआर-२, एफएल-३ आदी सर्व दि. १४ एप्रिल रोजी संपूर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी निर्गमित केले आहेत. अनुज्ञप्तीधारकांनी व संबंधितांनी या आदेशांचे पालन न केल्यास त्यांच्याविरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आदेशाद्वारे देण्यात आला आहे.

### प्रभारी मुख्याध्यापिकेकडून उद्धट अपमानास्पद वागणूक सेवानिवृत्त मुख्याध्यापिकाचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** प्रभारी मुख्याध्यापिका सौ. वर्षा गोपाल लांभाडे यांनी उद्धट व अपमानास्पद वागणूक देऊन शिवीगाळ केल्याची तक्रार सेवानिवृत्त उच्च श्रेणी मुख्याध्यापक सौ. छाया मोहन काळे यांनी बुलढाणा जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, मी २९ मार्च २०२५ ला जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत चार्ज पट्टी मिळण्यासाठी लिखित अर्ज घेऊन गेली असता. प्रभारी मुख्याध्यापिका सौ. वर्षा गोपाल लांभाडे यांनी चार्ज पट्टी देण्यास नकार दिला. यापूर्वीही मी त्यांना वारंवार चार्ज पट्टी ओ.सी मागितली असता हो देते म्हणून टाळाटाळ केली. म्हणून मी लेखी अर्ज घेऊन गेली असता त्यांनी मला शिवीगाळ करून अपमानास्पद वागणूक दिली व शाळेतून हाकलले. ह्यावेळी त्या शाळेतील सहाय्यक शिक्षक सपकाळ, गायकवाड,जैन मॅडम आणि जोगी मॅडम, जामकर मॅडम, चव्हाण मॅडम उपस्थित होत्या. माझ्या सारख्या त्याच शाळेतून सेवानिवृत्त झालेल्या मुख्याध्यापिका सोबत प्रभारी मुख्याध्यापिका सौ. वर्षा गोपाल लांभाडे अशी उद्धट पणाने व खालच्या पातळीत वागू शकतात तर गोरगरीब पालक व जनता ह्यांच्या सोबत कश्या वागत असतील ह्याची कल्पना न केलेली बरी त्या ज्या प्रकारे वागल्या हे एका शिक्षकेस अशोभनीय कृत्य आहे.तरी, माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून योग्य ती कारवाई संबंधित मुख्याध्यापिकेवर करून मला न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

### बुलढाणा तालुक्यातील ६६ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण; १६ एप्रिला सोडत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचनेनुसार बुलढाणा तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांची आरक्षण निश्चित करायचे आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३० अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतुदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान बुलढाणा तालुक्यातील सार्वत्रिक निवडणूकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदांचे आरक्षण सभा दि. १६ एप्रिल २०२५ रोजी तहसिल कार्यालय, बुलढाणा येथे होणार आहे.

तसेच अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती. नागरीकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गा अंतर्गत स्त्रियांकरिता आरक्षण सोडत दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे निश्चित करण्यात येणार आहे. सदर आरक्षण सोडती करीता बुलढाणा तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षाचे पदाधिकारी व नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सदर ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व तहसिलदार विठ्ठल कुमरे यांनी कळविले आहे.



## लाखो रुपये खर्च करून उभ्या केलेल्या हायमास्ट लाईट खाली अंधार

- लांडेवाडी गावातील प्रकार
- ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** गावात विविध सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, रात्रीच्या वेळेस अनुचित प्रकार घडू नये, रस्त्यावर प्रकाश राहावा, यासाठी लाखो रुपये खर्च करून उभ्या केलेल्या हायमास्ट लाईट खाली मात्र अंधार झाला आहे. अनेक दिवसांपासून तालुक्यातील अंजनी बुद्रुक अंतर्गत येत असलेल्या लांडेवाडी येथील हायमास्ट लाईट बंद असल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्याचबरोबर रात्रीच्या वेळेस महिला व मुलींना प्रवास करणे रस्त्यावरून जाणे भीतीदायक झाले आहे त्यामुळे याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष देऊन बंद असलेले हायमास्ट लाईट सुरू करावे अशी मागणी जनतेकडून होत आहे.

तालुक्यातील अंजनी बुद्रुक ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेली लांडेवाडी येथे लाखो रुपये खर्च करून गावातील मुख्य ठिकाणी हायमस्ट लाईट लावण्यात आले आहे सुरुवातीला हे हायमास्ट लाईट काही दिवस सुरू राहिले नंतर मात्र सदर हायमास्ट लाईक बंद पडल्याने सर्वत्र अंधार झाला आहे. सदर हायमास्ट लाईट सुरु करण्यासाठी ग्रामपंचायत ने सुद्धा दुर्लक्ष केल्याने जनतेला अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर महिलांना, वृद्धांना




लांडेवाडी येथील हायमस्ट लाईट बंद..!

रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. रस्त्यावर अंधार राहत असल्याने वृद्ध पडून जखमी झाल्याच्या सुद्धा घटना घडलेल्या आहेत. सदर हायमास्ट लाईट सुरु करण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन बंद असलेले हायमास्ट लाईट सुरु करण्याची गरज असताना याकडे मात्र, ग्रामपंचायत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. येत्या काही दिवसात पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे रस्त्यावर प्रकाश असणे आवश्यक आहे. नागरिकांची गैरसोय लक्षात घेता, ग्रामपंचायत प्रशासन तात्काळ हायमास्ट लाईट सुरु करावे, अशी मागणी लांडेवाडी येथील नागरिकांकडून होत आहे.

## अंबा वनक्षेत्रात ५६ लाखांचा तर पेट्रोलिंग करताना पकडला दीड लाखांचा गांजा

### शिरपूर तालुका पोलिसांची दमदार कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :**शिरपूर तालुक्यातील सांगवी वनविभागातील अंबा कक्ष क्षेत्रात वनरक्षक पवन पवार हे पेट्रोलिंग करीत असताना त्यांना काही संशयास्पद हालचाली लक्षात येताच त्यांनी सदर शेतामध्ये धाव घेतली. त्यांना पाहून काही लोक त्या ठिकाणाहून पळून गेले. मात्र मका, ज्वारी, बाजारीच्या उभ्या पिकात प्लास्टिकच्या ड्रममध्ये लपवून ठेवलेला ५६ लाख ८५ हजार रुपयांचा अकराशे किलो गांजा वनविभागाच्या गस्ती पथकाने जप्त केला.

याप्रकरणी शिरपूर तालुका पोलिस ठाण्यात काल रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शिरपूर तालुका पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक जयपाल हिरे हे आपल्या पथकासह खिलारे शिवारात पेट्रोलिंग करत असताना त्यांना संशयास्पद रिक्षा आढळली. यावेळेस पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांनी सादर रिक्षाची तपासणी केली असता त्या रिक्षामध्ये जवळपास दीड लाख रुपये किमतीचा ३० किलो गांजा हा शिरपूर तालुका पोलिसांना आढळून आला. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना एका रिक्षासह ताब्यात घेतले असून पुढील कारवाई करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांनी यावेळी दिली.

## कुणाचे काम किती मोठे हे लोकांनी निवडणुकीत दाखवून दिले, पालकमंत्री गुलाबराव पाटलांचा विरोधकांना टोला




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगावच्या धरणगाव येथे आज शिवसेनेची सदस्य मोहीम राबविण्यात आली. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर जोरदार टीका करत ''लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये जनतेने विरोधकांना जागा दाखवून दिली आहे. आज सरकार आमचं आहे, मी मंत्री आहे, मी आमदार आहे. जे आम्हावर टीका करतात, त्यांच्या पक्षाकडे उमेदवारही नव्हता. त्यांनी आधी उमेदवार तयार करावा, पाच वर्ष मेहनत घ्यावी आणि मग निवडणूक लढवावी'' असे म्हणत विरोधकांवर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जोरदार हल्ला चढविला आहे.

## भास्करराव काळे यांच्या नेतृत्वात शेकडो युवकांचा राष्ट्रवादी प्रवेश

- राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठक उत्साहात : नागरिकांचा बैठकीला उस्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या वतीने डोणगाव येथील हॉटेल ऋतुराज येथे ७ एप्रिल रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली डोणगाव जिल्हा परिषद सर्कल मधील कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी डोणगाव सह परिसरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या युवकांनी शरद चंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला.

आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर



लक्ष केंद्रित करण्यासाठी स्थानिक पक्ष संघटन वाढवण्याच्या उद्देशाने विविध विषयावर चर्चा करण्यासाठी तसेच गाव तिथे शाखा या उपक्रमाबद्दल उपस्थिताना मार्गदर्शन करण्यात आले व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या युवकांना राष्ट्रवादीच्या प्रवाहात आणा असेही आवाहन भास्करराव काळे यांनी केले. डोणगाव येथील सर्व समावेशक राजकारणी म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव पंकज पळसकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष गोपाल पाटील आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली डोणगाव येथील श्याम पांडव, माधव बोरकर, गणेश आढाव, पवन आखाडे, राम निंबेकर, सुरेश बाजड, भारत बाजड, अर्जुन पवार संतोष गोरे, गणेश बाजड, अफजल पठाण, महेश हरणे, मनोहर खोडके, भगवान नव्हाळे, राजू बशीरे, या युवा कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करून आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवावा, त्याचबरोबर गोरगरीब सर्वसामान्यांना सहकार्य करून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही यावेळी मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डोणगाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष विजय सरकटे यांनी केले. तर रवी वाघटकर यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिकांचे मोठ्या संख्येने उपस्थिती होती.